॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

**✲ सुविचार ✲**

विचार सकारात्मक असतील
तर परिणामही सकारात्मक येतात.

अहिल्यानगर | मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ९० वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com

## फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

**धोरण**

दोन पैसे शेतकऱ्याला
भाव खातोय कांदा
सरकारी धोरणाने
फक्त घालू नये वांदा

ओला सुका करत करत
कायमच पडतोय दुष्काळ
कृषिप्रधान देशात कधी
येईल बळीराजाचा काळ

# ‘मर्चंट डिस्काऊंट रेट’ निर्णय स्थगितीस ‘सर्वोच्च’ नकार!

## सुप्रीम कोर्टाचा निर्णय । २००० रुपयांपेक्षा जास्त व्यापारी युपीआय व्यवहारावर ०.४ टक्के शुल्क राहणार

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

२,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या काही यूपीआय व्यापारी व्यवहारांवर मर्चंट डिस्काऊंट रेट (एमडीआर) लागू करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाला स्थगिती देण्यास सुप्रीम कोर्टाने नकार दिला आहे. या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने सरकारला नोटीस बजावली आहे. मात्र, याचिकेवर अंतिम निर्णय होईपर्यंत एमडीआर लागू करू नये, अशी मागणी न्यायालयाने मान्य केली नाही.




२,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या ठराविक व्यापारी (पीटूएम) यूपीआय व्यवहारांवर मर्चंट डिस्काऊंट रेट लागू करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. या याचिकेवर आज सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. पूर्णपणे मोफत असलेल्या यूपीआय सेवेतील बदलांनुसार सरकारने १५ ऑक्टोबरपासून २,००० रुपयांपेक्षा जास्त मूल्याच्या व्यापारी व्यवहारांवर ०.४ टक्के शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र नागरिकांमधील दैनंदिन देवाणघेवाण (पीटूपी) आणि लहान रकमेचे व्यवहार पूर्णपणे मोफत ठेवण्यात आले आहेत. ७५,००० रुपये किंवा त्याहून अधिक रकमेच्या व्यवहारांवर हे शुल्क जास्तीत जास्त ३०० रुपयांपर्यंत मर्यादित (कॅप्ड) असेल.

रेल्वे, दूरसंचार, विमा, इंधन आणि कृषी यांसारख्या आवश्यक सेवांसाठी २,००० रुपयांवरील व्यवहारांवर प्रतिव्यवहार ५ रुपये इतके निश्चित शुल्क लागू होईल. तसेच म्युच्युअल फंड आणि शेअर्समधील गुंतवणुकीवर ०.०२ टक्के (कमाल ३०० रुपये) शुल्क आकारले जाईल. सुनावणीदरम्यान केंद्र सरकारच्या वतीने अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एन. वेंकटरामन यांनी न्यायालयाला सांगितले की, यूपीआय वापरणाऱ्या सुमारे ९६ टक्के लोकांना या शुल्काचा फटका बसणार नाही. यावर हा मुद्दा कायदेशीरपेक्षा तांत्रिक स्वरूपाचा अधिक असल्याचे न्यायालयाने नमूद केले. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी एमडीआर व्यवस्था लागू करण्यास तात्पुरती स्थगिती देण्याची मागणी केली. मात्र, न्यायालयाने ही मागणी फेटाळली. या प्रकरणी केंद्र सरकारच्या उत्तरानंतर पुढील सुनावणी होणार आहे.

केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे की, व्यापाऱ्यांकडून आकारला जाणारा एमडीआर ग्राहकांकडून वसूल करू नये, यासाठी बँकांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच युपीआय ॲप्सना कोणतेही अतिरिक्त प्लॅटफॉर्म शुल्क किंवा लपविलेले शुल्क आकारण्यास मनाई करण्यात आली आहे.

### याचिकेत नेमके आक्षेप काय?

● ॲडव्होकेट अंजन दत्ता यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेत केंद्राच्या १४ सप्टेंबरच्या अधिसूचनेला आणि १५ सप्टेंबर रोजी जाहीर केलेल्या आराखड्याला आव्हान दिले आहे.

**१) पारदर्शकतेचा अभाव**
हे शुल्क पुरेशा वैधानिक सुरक्षिततेशिवाय आणि सार्वजनिक चर्चेविना घाईघाईने लागू करण्यात आल्याचा आरोप याचिकेत आहे.

**२) मनमानी अधिकार**
पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टीम्स ॲक्ट, २००७ च्या सुधारित कलम १०(ए) च्या वैधतेला आव्हान देण्यात आले असून यामुळे प्रशासनाला अनिर्बंध अधिकार मिळत असल्याचे म्हटले आहे.

**३) रूपे कार्डशी तुलना**
रूपे डेबिट कार्डवरील व्यवहार कोणत्याही मर्यादेशिवाय मोफत असताना यूपीआयवरच मर्यादा घालणे भेदभावपूर्ण असल्याचा युक्तिवाद करण्यात आला आहे.

## SPOT NEWS

### राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२६ पुढे ढकलली

**● मुंबई –** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. २०२६ च्या राज्यसेवा मुख्य परीक्षा आणि इतर परिक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतलेला आहे. २०२५ मध्ये झालेल्या राज्यसेवा मुख्य परिक्षेच्या उत्तरपत्रिकांचे पुन:र्मुल्यांकन करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. काही तासांपूर्वीच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्रसिद्धीपत्रक काढून हा महत्त्वाचा निर्णय जारी करण्यात आलेला आहे. गेल्या काही महिन्यांपूर्वी राज्यामध्ये झालेल्या पेपरफुटीच्या प्रकरणामुळे हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आलेला आहे. अनेक विद्यार्थी आणि विद्यार्थी संघटनांकडून २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या राज्यसेवा मुख्य परिक्षेच्या मुल्यांकनाबद्दल आक्षेप नोंदवण्यात आला होता. हाच आक्षेप लक्षात घेत, राज्य सेवा मुख्य परिक्षा- २०२५ च्या उत्तर पत्रिकांचे पुन:र्मुल्यांकन करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे २०२६ मध्ये होणारी राज्यसेवा मुख्य परीक्षा आणि इतर परिक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतलेला आहे. वारंवार पेपरफुटीचे प्रकरण होत असल्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा घडवून आणण्याची मागणी अनेक विद्यार्थी संघटनांकडून केली जात आहे. इतकंच नाही तर, विद्यार्थ्यांकडून आणि पालकांकडूनही आयोगाच्या अध्यक्षांनी या कथित घोटाळ्यांची जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणीही केली जात आहे.

### २०३७ पर्यंत १००% इलेक्ट्रिक बसेसचे लक्ष्य

**● मुंबई –** महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात धावणाऱ्या एसटी महामंडळाच्या ताफ्यात आता मोठा बदल होणार आहे. सन २०३७ पर्यंत एसटीचा १००% ताफा इलेक्ट्रिक करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यामुळे पारंपरिक डिझेल बसेसचे प्रमाण टप्प्याटप्प्याने कमी होऊन भविष्यात महाराष्ट्राची ‘लालपरी’ ‘ई-लालपरी’ म्हणून धावणार आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. एसटीच्या मुख्यालयात झालेल्या महामंडळाच्या ३१२ व्या संचालक मंडळाच्या बैठकीत या योजनेबाबत चर्चा करण्यात आली. सध्या एसटी महामंडळाच्या ताफ्यात सुमारे १४,००० बसेस आहेत. त्यापैकी सुमारे १,१०० बसेस ई-बसेस आहेत. दरम्यान, ताफ्यात दाखल होणाऱ्या सुमारे ५,००० नवीन डिझेल बसेस या शेवटच्या डिझेल बसेस ठरणार असल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले. त्यानंतर नव्या बसेसची खरेदी प्रामुख्याने इलेक्ट्रिक स्वरूपात केली जाणार आहे.

## केंद्र सरकारचे आता ‘चिंतन शिबिर २.०’

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

मोदी सरकार आता चिंतनाकडून कृतीकडे वाटचाल करत असून केंद्रीय मंत्रिमंडळाच्या ३० सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या चिंतन शिबिर २.० मध्ये केंद्रीय मंत्र्यांसाठी एक सविस्तर कृती आराखडा (ॲक्शन प्लॅन) सादर केला जाणार आहे. २३-२४ सप्टेंबर रोजी सेवा तीर्थ येथे झालेल्या चर्चेच्या पहिल्या फेरीत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिलेल्या सूचना व त्या प्रक्रियेतून पुढे आलेल्या उद्दिष्टांवर आधारित हा आराखडा असेल.



या माध्यमातून मंत्र्यांसाठी स्पष्ट संदेशच आहे. केवळ योजनांच्या अंमलबजावणीपुरते मर्यादित न राहता त्या पलीकडे जाऊन १०० टक्के व्याप्ती साध्य करा आणि केंद्र सरकारच्या सुमारे ४०-४५ प्रमुख कल्याणकारी योजना प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी धोरणे तयार करा. मंत्र्यांना प्रत्यक्ष स्थिती जाणून घेण्यास आणि नकारात्मक प्रचाराला प्रत्युत्तर देण्यासाठी सज्ज राहण्यास सांगण्यात आले आहे. प्रत्येक मंत्र्याला सहकाऱ्यांकडून मिळालेले प्रशासकीय अनुभव आणि शिकवण यांची नोंद करण्यास, तसेच त्यांचे आपल्या विभागासाठी प्रत्यक्ष कृतीयोग्य उपाययोजनांमध्ये रूपांतर करण्यास सांगण्यात आले आहे. प्रशासकीय लालफितीच्या कारभारात न अडकता लाभ लोकांपर्यंत पोहोचतील याची खात्री करण्यासाठी प्रत्यक्ष त्या क्षेत्रात उपस्थित राहण्यावर भर देण्यात आला आहे.

या चर्चेत सहभागी असलेल्या मंत्र्यांमध्ये संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासह पियुष गोयल, हरदीपसिंग पुरी, शिवराजसिंह चौहान व अश्विनी वैष्णव यांचा समावेश आहे.

## यायचे असेल तर आमच्यात या : शरद पवार

**● मुंबई । वीरभूमी–**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बाबत विविध प्रकारच्या चर्चा सुरू असतात, अशा कोणत्याही चर्चेला काही अर्थ नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महाराष्ट्रात भक्कमपणे काम करत आहे. ज्याला कोणाला यायचे आहे, त्यांनी आमच्यात यावे. आम्ही कुणाच्या सहभागी होणार नाही, अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मांडली.



दुष्काळ, एमपीएससीतील घोटाळा, एसआयआर प्रक्रियेतील वादाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सोमवारी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे राज्य कार्यकारणीची बैठक झाली. या कार्यकारणीच्या बैठकीत प्रामुख्याने दुष्काळ आणि पक्ष संघटनेवर प्रामुख्याने भर देण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या बाबत अनेक चर्चा माध्यमांमध्ये रंगतात असतात, अशा कोणत्याही चर्चेला काहीच अर्थ नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मोठ्या ताकदीने राज्यभरात काम करत आहे, त्यामुळे आमच्या बाबत कोणत्याही प्रकारची चर्चा करू नका. ज्याला कुणाला यायचे आहे, त्यांनी आमच्या यावे, आम्ही कुठेही जाणार नाही, असा इशाराच पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला दिला. प्रसारमाध्यमातून सतत शरद पवार गट अजित पवार गटामध्ये किंवा काँग्रेसमध्ये विलीनीकरण होण्याची चर्चा रंगत असते, या चर्चेच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी दिलेला इशारा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

शरद पवारांच्या या वक्तव्यावर अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली. पवारांच्या राजकीय टायमिंगचा संदर्भ देत त्यांनी या वक्तव्यावर थेट भाष्य करणे टाळले. तटकरे पत्रकारांशी बोलताना म्हणाले साहेबांचे टायमिंग संपूर्ण महाराष्ट्राला ठाऊक आहे. अनेक प्रसंगी त्यांनी साधलेले टायमिंग अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. या विशिष्ट वेळी हे विधान करण्यामागचा त्यांचा नेमका काय हेतू असू शकतो, हे या क्षणी सांगणे कठीण आहे.

## भारत-म्यानमार सीमेवर संशयित दहशतवाद्यांकडून गोळीबार

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

अरुणाचल प्रदेशातील चांगलांग येथे भारत-म्यानमार सीमेवर संशयित दहशतवाद्यांनी गोळीबार केला. या गोळीबारात आसाम रायफल्सचा एक जवान शहीद झाला आहे. या हल्ल्यात चार जवान जखमी झाले आहेत. नामपोंग सर्कल अंतर्गत नामपोंग नाला जवळ मंगळवारी सकाळी ६.३० च्या सुमारास हा हल्ला करण्यात आला, असे अधिका-यांनी सांगितले.

२१ व्या आसाम रायफल्सचे जवान ज्या सीमा कुंपणाचे काम सुरू होते, तिथे गस्त घालत होते. गस्तीवर असताना संशयित दहशतवाद्यांनी जवानांवर गोळीबार केला. यात एक जवान शहीद झाला तर चार जवान जखमी झाले. जानखोकाई कुकी(४२) असे शहीद झालेल्या जवानाचे नाव आहे. जखमी जवानांना उपचारासाठी हलवण्यात येत आहे. या घटनेनंतर सुरक्षा दलांनी परिसरात शोधमोहीम अधिक तीव्र केली आहे. प्राथमिक तपासात एनएससीएन-के-वायए (युंग आंग गट) शी संबंधित दहशतवाद्यांनी हा हल्ला केल्याची माहिती मिळते. मात्र, हल्लेखोरांच्या ओळखीबाबत अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. आसाम रायफल्सकडून अधिकृत निवेदनाची प्रतीक्षा आहे.

## एसी, टीव्ही, वॉशिंग मशीन १ ऑक्टोबरपासून महागणार

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

यंदा ऑक्टोबर महिन्यात दसरा तर नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला दिवाळीचा सण आहे. या दोन्ही सणांच्या वेळी भारतीय ग्राहक मोठ्या प्रमाणात एसी, टीव्ही, इतर घरगुती इलेक्ट्रिक उपकरणांची खरेदी करतात. मात्र, यंदा या सणांच्या अगोदरच ग्राहकांना महागाईचा फटका बसणार आहे. कारण १ ऑक्टोबरपासून एसी, टीव्ही यासह इतर इलेक्ट्रिक उपकरणांच्या दरात वाढ होऊ शकते.

इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांकडून विविध कारणांमुळे दरवाढ करण्याची तयारी करण्यात येत आहे. धातूंचे वाढलेले दर, डॉलरच्या तुलनेत रुपयांची घसरण, आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थिती यामुळे भारतीय ग्राहकांवर महागाईचे संकट ओढवणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांची निर्मिती करणा-या कंपन्यांकडून १ ऑक्टोबर २०२६ पासून दरवाढ करण्याचा निर्णय घेतला गेला आहे.

इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांकडून १ ऑक्टोबरपासून करण्यात येणारी दरवाढ ही या वर्षातील तिसरी दरवाढ असेल. तांबे, ॲल्युमिनिअम, क्रूड ऑईलपासून निर्माण होणारी उत्पादने, कच्चा मालाचा खर्च यात वेगाने वाढ झाल्याने आणि दळणवळणाचा खर्च वाढल्याने दरवाढ करण्यात येत असल्याची माहिती आहे. १ ऑक्टोबरपासून एसी, टीव्ही आणि इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांच्या

एसीच्या दरांत ५ ते ८ टक्क्यांची वाढ केली जाऊ शकते. याशिवाय वॉशिंग मशीन, फ्रीज आणि एलईडी टीव्हीच्या दरात ३ ते ४ टक्क्यांची वाढ केली जाऊ शकते. ब्लू स्टार, गोदरेज अप्लायनसेस, हायर, डाइकिन, सुपर प्लास्ट्रोनिक्स यासारख्या प्रमुख इलेक्ट्रॉनिक्स कंपन्यांकडून ४ ते १० टक्के दरवाढ लागू केली आहे. एलजी आणि बॉश होम कम्फर्टने एसीच्या दरात ५ टक्के वाढ केली आहे.

ब्लू स्टारचे व्यवस्थापकीय संचालक बी. थियागराजन यांनी युद्धामुळे सर्व वस्तूंचे दर वाढत असल्याचे म्हटले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत उत्पादन खर्च १५ टक्के वाढला आहे. मात्र, जीएसटीमुळे ग्राहकांवर ५ टक्के दरवाढीचा प्रभाव पडेल, असे सांगण्यात आले आहे.

# ‘निरोगी उद्यासाठी आयुर्वेद’ ; जिल्हा आयुष रुग्णालयात आयुर्वेद दिवस उत्साहात

## आयुर्वेदिक जीवनशैली, योग्य आहार-विहार आणि योगाच्या माध्यमातून आरोग्य संवर्धनाचा संदेश

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

निरोगी जीवनशैलीचा अंगीकार, आजारांचा प्रतिबंध आणि आयुर्वेदाच्या शास्त्रीय तत्त्वांचा दैनंदिन जीवनात वापर करण्याचा संदेश देत जिल्हा आयुष रुग्णालय, अहिल्यानगर येथे २३ सप्टेंबर रोजी ११वा आयुर्वेद दिवस विविध जनजागृतीपर उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आयोजित या कार्यक्रमाची यंदाची संकल्पना ‘निरोगी उद्यासाठी आयुर्वेद’ अशी होती.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते धन्वंतरी पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. ज्येष्ठ आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. महेंद्र शिंदे, आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकचे विद्या परिषद सदस्य प्रा. डॉ. अजितकुमार फुंदे, आयुर्वेद व योगतज्ज्ञ प्रा. डॉ. ज्योती चोपडे आणि डॉ. अंजली शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुवर्णमाला बांगर होत्या. रुग्ण, अधिकारी-कर्मचारी, परिचारिका महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच नागरिकांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

डॉ. महेंद्र शिंदे यांनी आयुर्वेदातील दिनचर्या, ऋतुचर्या, योग्य आहार-विहार, व्यायाम, योग व ध्यानधारणा यांचे आरोग्य संवर्धनातील महत्त्व स्पष्ट केले. मधुमेह, हृदयविकार आणि सांध्यांचे आजार यांसारख्या असांसर्गिक आजारांच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी आयुर्वेदोक्त जीवनशैली उपयुक्त ठरू शकते, असे त्यांनी सांगितले.

प्रा. डॉ. ज्योती चोपडे यांनी आयुर्वेदिक उपचारपद्धती, पंचकर्म, आहार चिकित्सा तसेच असांसर्गिक आजारांच्या प्रतिबंधात योग व आयुर्वेदाची भूमिका याबाबत मार्गदर्शन केले. नागरिकांनी आरोग्यदायी सवयी सातत्याने अंगीकारून आयुर्वेदाच्या शास्त्रीय तत्त्वांचा योग्य पद्धतीने उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रा. डॉ. अजितकुमार फुंदे यांनी आयुष मंत्रालयाच्या माध्यमातून आयुष सेवा बळकट करण्यासाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. ग्रामीण भागातील आयुष आरोग्यवर्धिनी केंद्रांपासून जिल्हा आयुष रुग्णालये व आयुष वैद्यकीय महाविद्यालयांपर्यंत गेल्या दशकात झालेल्या सेवा विस्तारावर त्यांनी प्रकाश टाकला.

वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुवर्णमाला बांगर यांनी संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि योग्य दिनचर्येचा अवलंब करण्याचे आवाहन केले. यावेळी रुग्णांसाठी तयार करण्यात आलेल्या पथ्यपत्रिकेचे तसेच आयुर्वेद प्रदर्शनाचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.



दरम्यान, आयुर्वेद दिन आणि ‘पोषण माह’च्या अनुषंगाने १७ ते २२ सप्टेंबरदरम्यान विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले. डॉ. कीर्ती शेळके यांनी विद्यार्थ्यांना, डॉ. शौनक मिरीकर यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना मधुमेह प्रतिबंध व नियंत्रणाबाबत, तर डॉ. अर्चना लांडे यांनी ‘आहारातून आरोग्याकडे’ या विषयावर नागरिक व आरोग्य कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. परिचर्या महाविद्यालयातही आयुर्वेदोक्त जीवनशैलीविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कीर्ती शेळके यांनी केले, तर आभार डॉ. अर्चना लांडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा आयुष रुग्णालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# SPOT NEWS

## प्रा. स्वप्नील सहस्त्रबुद्धे यांना संस्कृत विषयात पीएचडी

**● अकोले । वीरभूमी –**



अकोलेचे भूमिपुत्र प्राध्यापक स्वप्नील अनिल सहस्त्रबुद्धे यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची संस्कृत विषयातील विद्यावाचस्पती (पीएचडी) पदवी घोषित झाली आहे. प्रा. सहस्त्रबुद्धे यांनी 'नल-दमयंती प्रसिद्ध निषधराज नलराज यांच्या महाराजनलविरचितम् पाकदर्पणम् : सांस्कृतिक, वाङ्मयीन, भाषिक तथा आयुर्वेदमूलक चिकित्सक अभ्यास' या विषयावर प्रबंध सादर केला. त्यांना जळगाव येथील मुळजी जेठा महाविद्यालयाच्या संशोधन विभागप्रमुख तथा संस्कृत विभागप्रमुख डॉ. भाग्यश्री भलवतकर यांचे मार्गदर्शन लाभले. 'महाराजनलविरचितम् पाकदर्पणम्' हा ग्रंथ सूर्यवंशातील ख्यातकीर्त राजा ऋतुपर्ण यांच्या दरबारात नलराजांनी सादर केल्याचे मानले जाते. पाककला तथा पाकशास्त्र क्षेत्रातील हा प्राचीन ग्रंथ असून, संस्कृत भाषेत लिहिलेल्या या ग्रंथात आयुर्वेदशास्त्रातील आहार, विहार आणि आरोग्य यांच्या पायाभूत मूल्यांचा विचार करण्यात आला आहे. विविध पाककृतींच्या सविस्तर प्रक्रियेसह त्यांचे वर्णन या ग्रंथात आढळते. संस्कृत साहित्यकृतीचा उत्कृष्ट नमुना म्हणूनही या ग्रंथाकडे पाहिले जाते. या नाविन्यपूर्ण, प्राचीन आणि जीवनोपयोगी ग्रंथावरील संशोधनाबद्दल डॉ. स्वप्नील सहस्त्रबुद्धे यांचे विविध क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी स्वतः घोषणापत्र डॉ. सहस्त्रबुद्धे यांच्या हाती देत विद्यावाचस्पती पदवीची घोषणा केली. डॉ. सहस्त्रबुद्धे हे मूळचे अकोलेचे असून त्यांचे बालपण अकोले येथेच गेले. सध्या ते अहिल्यानगर येथे वास्तव्यास आहेत. त्यांनी श्रीगोंदे येथील विवेकानंद आयुर्वेद महाविद्यालयासह अन्य काही आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये संस्कृत विषयाचे अध्यापन केले आहे. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल अकोले परिसरातून तसेच शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

## क्रीडा स्पर्धांमध्ये अभिनव पब्लिक स्कूलचे घवघवीत यश!




**● अकोले । वीरभूमी –**

अकोले येथील अभिनव अभिनव शिक्षण संस्थेच्या मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय शालेय हँडबॉल व क्रिकेट स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. तालुकास्तरीय हँडबॉल स्पर्धेत शाळेच्या १७ वर्षांखालील मुलांच्या संघाने विजेतेपद पटकावले. तसेच १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने आणि १९ वर्षांखालील मुलांच्या संघाने उपविजेतेपद मिळवले. खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत ही यशस्वी कामगिरी केली. तसेच, २६ सप्टेंबर २०२६ रोजी तालुकास्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धेत शाळेच्या १४ वर्षांखालील मुलांच्या संघाने अगस्ती विद्यालय, अकोले या संघाचा पराभव करून प्रथम क्रमांक पटकावला. या विजयासह संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रवेश मिळवला. तर अभिनव ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या १९ वर्षांखालील संघाने स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून आपली छाप पाडली. या सर्व यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव नवले, सचिव विक्रम नवले आणि शाळेच्या प्राचार्या अल्फोन्सा डी. विभाग प्रमुख स्मिता पुंड, पर्यवेक्षक सानप पराग, उषा हासे यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. या यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक आदिनाथ आभाळे, सागर साळुंके, अश्विनी फापाळे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीमुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील प्रगतीला नवी दिशा मिळाली आहे.

# महादजी शिंदे राजवाड्यासह पानिपत वीरांची स्मारके जतन करा!

### शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे तहसीलदारांना निवेदन । श्रीगोंद्यात भव्य वारसा स्मारक व शिंदेशाही संग्रहालय उभारण्याची मागणी

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

शिंदे सरदारांच्या शौर्याचा आणि पानिपतच्या रणभूमीवर पराक्रम गाजविणाऱ्या वीरांच्या इतिहासाचा साक्षीदार असलेल्या श्रीगोंदा शहरातील ऐतिहासिक वास्तू आणि स्मृतिस्थळांचे जतन करून त्यांना वारसा स्मारकांचा दर्जा द्यावा, अशी मागणी शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनने केली आहे. महादजी शिंदे राजवाड्यासह पानिपत वीरांच्या स्मृती जतन करण्यासाठी संस्थेच्या वतीने तहसीलदार सचिन डोंगरे आणि भूमी अभिलेख कार्यालयाला निवेदन देण्यात आले.

श्रीगोंदा शहराला शिंदे सरदारांच्या इतिहासाचा समृद्ध वारसा लाभला आहे. मात्र, ऐतिहासिक महत्त्व असलेल्या अनेक वास्तू आणि स्मृतिस्थळांकडे काळानुरूप दुर्लक्ष झाले असून, ही ऐतिहासिक संपदा जनसामान्यांच्या नजरेआड जात आहे. या वास्तूंचे संवर्धन करून पुढील पिढीपर्यंत हा इतिहास पोहोचविण्याची गरज असल्याचे संस्थेने निवेदनात म्हटले आहे.



शहरातील दिल्ली वेस, पानिपत शौर्य वेस, महादजी शिंदे राजवाडा, पूर्व वेस, मैनाबाई माळावरील छत्री समाधी, महादजी शिंदे पादुका स्मारक, बारवा आणि पानिपत वीरांशी संबंधित ऐतिहासिक पाऊलखुणांचे जतन करण्याची मागणी करण्यात आली आहे. या सर्व स्थळांचे पुरातत्त्व विभागामार्फत सर्वेक्षण करून त्यांना वारसा स्मारक म्हणून घोषित करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया आणि कागदपत्रांची पूर्तता स्थानिक यंत्रणेने करावी, अशी भूमिका संस्थेने मांडली.

महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाच्या सहाय्यक संचालकांकडे यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. पर्यटन व पुरातत्त्व विभागाने यापूर्वीच्या निवेदनांची दखल घेत तहसीलदारांमार्फत ऐतिहासिक स्मारकांची माहिती मागविली आहे. त्यानुसार अद्ययावत भूराजस्व माहिती तातडीने उपलब्ध करून देण्याचे आवाहन करण्यात आले.

श्रीगोंदा शहरात पानिपत वीरांचे भव्य स्मारक, शिंदेशाही घराण्याच्या ऐतिहासिक वास्तूंचे संग्रहालय आणि शहरातील प्रमुख चौकात राणोजी, दत्ताजी, जयप्पा, जनकोजी व महादजी शिंदे यांच्या शौर्याचे चित्रशिल्प उभारावे, अशी श्रीगोंदेकरांची जनभावना असल्याचे संस्थेचे अध्यक्ष राजेश इंगळे यांनी सांगितले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष राजेश इंगळे, कायदेशीर सल्लागार ॲड. गोरख कडूस, वारसा संवर्धन समितीचे उपाध्यक्ष सचिन भोसले व अमोल बडे उपस्थित होते. ऐतिहासिक वारसा केवळ वास्तूंपुरता मर्यादित न ठेवता तो श्रीगोंद्याच्या सांस्कृतिक ओळखीचा भाग बनविण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे इंगळे यांनी स्पष्ट केले.

## नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याच्या आ. विवेक कोल्हे यांच्या प्रशासनाला सूचना

**● कोपरगाव । वीरभूमी–**

पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कोपरगाव तालुक्याचे नाव दुष्काळ यादीत आलेले असून बाधित शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्यात यावेत, अशी सूचना आमदार विवेक कोल्हे यांनी प्रशासनला केली आहे.



खरीप हंगामातील Trigger-1 (प्रथम कळ) लागू झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये पंचनामे करण्याची कार्यवाही तातडीने करण्याचे निर्देश राज्य शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यानुसार कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक २७ सप्टेंबर २०२६ रोजी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सुधारित सूचनांचे पत्र पाठविले आहे. त्यानुसार कोपरगाव तालुक्यातील पंचनामे तातडीने करण्याची सूचना कोल्हे यांनी प्रशासनाला केली आहे तसेच शेतकऱ्यांना कुठे अडचण येत असेल तर त्या संदर्भात सहकार्य करून प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विलंब करू नये असेही सांगितले आहे.

या पत्रानुसार Trigger-1 लागू झालेल्या तालुक्यांमध्ये क्षेत्रीय स्तरावर उपलब्ध असलेल्या सोप्या जोडलेल्या सुधारित प्रपत्रात पंचनाम्याची कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. पंचनाम्याच्या अहवालामध्ये AgriStack Farmer ID घेण्यात यावा. शेतकऱ्याचा Farmer ID उपलब्ध नसल्यास UID/आधार क्रमांक संकलित करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

कोपरगाव तालुक्यातील पावसाअभावी तसेच दुष्काळी परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे महसूल व कृषी विभागाच्या यंत्रणेमार्फत प्रत्यक्ष शेतावर जाऊन तातडीने पूर्ण करावेत, अशी सूचना आमदार विवेक कोल्हे यांनी प्रशासनाला केली आहे.

पंचनाम्याची कार्यवाही वेळेत पूर्ण झाल्यास बाधित शेतकऱ्यांना शासनाच्या दुष्काळी मदत व इतर संबंधित उपाययोजनांचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पुढे नेण्यास मदत होणार आहे. त्यामुळे संबंधित विभागांनी कोपरगाव तालुक्यातील पंचनाम्याची कार्यवाही विलंब न करता पूर्ण करावी, अशी सूचना करण्यात आली आहे.

## गणेश मंडळाच्या शिल्लक निधीतून गोसेवेला हातभार; बाल गणेश मंडळाचा स्तुत्य उपक्रम



**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी शहराजवळील शिक्षक कॉलनी येथील बाल गणेश मंडळाने गणेशोत्सवानंतर उरलेली वर्गणीची शिल्लक रक्कम सामाजिक कार्यासाठी देत एक आदर्श आणि कौतुकास्पद उपक्रम राबविला आहे.

गणेशोत्सवासाठी जमा झालेल्या एकूण वर्गणीतील गणेश विसर्जनानंतर शिल्लक राहिलेला निधी पाथर्डी येथे सुरू असलेल्या गोरक्षण व गोसेवेच्या कार्यासाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी पाथर्डी गोसेवा संघाच्या कार्यकर्त्यांकडे सुपूर्द केला.

सण-उत्सवाच्या माध्यमातून केवळ आनंद आणि धार्मिक भावना जपण्याबरोबरच समाजातील गरजू घटक व गोमातेच्या सेवेसाठी आपले योगदान देण्याचा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी आहे.

बाल गणेश मंडळ शिक्षक कॉलनीच्या सर्व कार्यकर्त्यांचे या स्तुत्य आणि समाजोपयोगी उपक्रमाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन व आभार व्यक्त करत उत्सवातून सेवा आणि सेवेतून संस्कार या विचाराचा सुंदर आदर्श या उपक्रमातून निर्माण झाला असल्याचे गोरक्षण समीतीने प्रतिक्रिया देताना म्हटले.

## भावीनिमगाव येथील शिबिराचा २३५ ज्येष्ठ नागरिकांना वयोश्री योजनेचा लाभ

**● शेवगाव । वीरभूमी –**

भावीनिमगाव ता. शेवगाव येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजने अंतर्गत भव्य आरोग्य तपासणी व नोंदणी शिबीर उत्साहात पार पडले. या शिबिरात परिसरातील २३५ पात्र ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी करून त्यांची ऑनलाइन नोंदणी पूर्ण करण्यात आली.

माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील व आमदार मोनिका राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विखे पाटील मेडिकल कॉलेजच्या वैद्यकीय पथकातील डॉ. अभिजीत दिवटे, डॉ. दीपक अनाप, डॉ. अभिजीत मिरेकर व डॉ. सुजल भालेराव यांनी वैद्यकीय तपासणी केली. यामध्ये ईसीजी, डोळे, कान तपासणीसह इतर आवश्यक चाचण्या करण्यात आल्या. तपासणीनंतर पात्र लाभार्थ्यांचे तत्काळ ऑनलाइन रजिस्ट्रेशन पूर्ण करण्यात आले. भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष अनिल सुपेकर यांनी या संपूर्ण कॅम्पचे उत्कृष्ट नियोजन करत ज्येष्ठ नागरिकांना एकाच छताखाली वैद्यकीय तपासणी, ऑनलाइन नोंदणी व योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळावा, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन केल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हभप सिताराम महाराज चेडे होते. तर हरिश्चंद्र महाराज खरड, दहिगावने प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते.

शिबिरात नोंदणी झालेल्या पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार सहाय्यक साहित्याचे वाटप येत्या आठ दिवसांत करण्यात येणार आहे. यामुळे वयोवृद्धांना दैनंदिन जीवनात मोठी मदत होणार आहे. शासन योजनेचा थेट लाभ मिळाल्याने व आरोग्य तपासणीची सोय उपलब्ध झाल्याने सर्व ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.



या प्रसंगी संदीप खरड, सुभाष बरबडे, आप्पासाहेब सुकासे, मोहन लोढे, तुकाराम लोढे, शरद थोटे, सतीश निकम, अनंता व्यवहारे, पांडुरंग शेळके, अशोक सुपेकर, देविदास शेळके, रामजी काळे, शरद पारखे यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद थोटे यांनी केले, तर प्रास्ताविक भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष अनिल सुपेकर यांनी केले.

## विद्यार्थ्यांनी रोजगारनिर्मिती करणारे उद्योजक व्हावे

### डॉ. निनाद पुराणिक । छत्रपती महाविद्यालयात स्टार्टअपवर एकदिवसीय कार्यशाळा



**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि. २८) 'एस.पी.पी.यू. स्टार्टअप टॉक' या व्याख्यानमालेतील पहिल्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची जाणीव निर्माण करून नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यवसायाचे स्वरूप देण्याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

पुणे येथील मॅरियन क्टिंग इंग्रेडियंट लिमिटेडचे संचालक डॉ. निनाद पुराणिक आणि सहसंस्थापक डॉ. अनुप देशपांडे यांनी स्टार्टअप उभारणीपासून व्यवसायाच्या विस्तारापर्यंतचा प्रवास उलगडला. एखाद्या समस्येतील संधी ओळखून कल्पना विकसित करणे, संशोधन, उत्पादननिर्मिती, बाजारपेठेचा अभ्यास आणि व्यवसायाचा विस्तार हे स्टार्टअपचे महत्त्वाचे टप्पे असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी नोकरी शोधण्याऐवजी रोजगारनिर्मिती करणारे उद्योजक व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी संशोधन आणि नवकल्पना यांचा दैनंदिन जीवनाशी असलेला संबंध स्पष्ट केला. संशोधनाचा उपयोग मानवी जीवन अधिक सुलभ करण्यासाठी झाला पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.


प्रास्ताविक डॉ. ज्ञानेश्वर कर्पे यांनी केले. यावेळी प्रा. बाळासाहेब महारनूर, डॉ. प्रमोद परदेशी, डॉ. मुकुंद भोस, डॉ. संदीप अभंग, डॉ. मिलिंद बेडसे, डॉ. योगेश अहिरे, डॉ. विलास सुद्रिक, प्रा. सागर रोडे, डॉ. मयूर बारवकर यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. कोमल कांबळे यांनी केले, तर आभार प्रा. प्रवीण नागवडे यांनी मानले.

# एसआयआर च्या माध्यमातून मतचोरीचा आरोप

### मुख्य निवडणूक आयुक्तांना बडतर्फ करून अटक करण्याची काँग्रेसची मागणी । जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण एसआयआर प्रक्रियेच्या माध्यमातून मतदारांची नावे वगळून मतचोरी केली जात असल्याचा आरोप करत अहिल्यानगर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर कारवाई करून त्यांना सेवेतून बडतर्फ करावे तसेच अटक करावी, अशी मागणी करून निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.



काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. निवडणूक प्रक्रिया स्वतंत्र, निष्पक्ष आणि पारदर्शक असणे आवश्यक असून, निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये संशय निर्माण होऊ नये, अशी भूमिका काँग्रेसने निवेदनातून मांडली.

निवेदनात म्हटले आहे की, निवडणूक आयोगाच्या माध्यमातून मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाची प्रक्रिया सुरू असून, या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात मतदारांची नावे वगळली जात असल्याचा काँग्रेसचा आरोप आहे. तसेच मतदार यादीतील फेरफाराबाबत विविध माध्यमांमध्ये वृत्त प्रसिद्ध झाल्याचा दाखलाही निवेदनात देण्यात आला आहे.

काँग्रेसने पश्चिम बंगालसह काही राज्यांमधील मतदार यादीतील नावांबाबत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांचा उल्लेख करत, मतदारांच्या नावांची वगळणी आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत स्पष्टीकरण देण्याची मागणी केली आहे. निवडणूक प्रक्रिया आणि संविधानिक मूल्यांचे संरक्षण करण्यासाठी संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण समवेत फिरोज खान, मयूर पाटोळे, सुनील शेत्रे, माजी नगरसेवक फैयाज शेख, यश चव्हाण, अभिषेक शिंदे, समर्थ व्यवहारे, अभिजीत कांबळे, श्यामराव वागस्कर, स्वप्निल शिंदे, डॉ. बापू चंदनशिवे, रियाज शेख, विवेक कसबे, राजेंद्र कर्डिले, रवी सातपुते, अकील सय्यद यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## दक्ष लुणावतची महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १४ वर्षांखालील स्पर्धेसाठी निवड

**● पाथर्डी । वीरभूमी –**



महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातून आयोजित करण्यात येणाऱ्या १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेसाठी फ्लाइंग बर्ड्स अकॅडमी स्कूलचा विद्यार्थी दक्ष अमितकुमार लुणावत याची आर्यन्स क्रिकेट अकॅडमी, पुणे या संघात निवड झाली आहे. त्याच्या या निवडीमुळे फ्लाइंग बर्ड्स अकॅडमी स्कूलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. दक्ष लुणावत याने क्रिकेटच्या सरावात सातत्य ठेवत आपल्या खेळातील कौशल्य, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर ही निवड मिळवली आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातून होणाऱ्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत खेळण्याची संधी मिळाल्याने दक्षच्या क्रिकेट कारकिर्दीला निश्चितच नवी दिशा मिळणार आहे. दक्षच्या या यशामध्ये फ्लाइंग बर्ड्स अकॅडमीचे प्राचार्य मनोज गोल्हार तसेच सर्व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शालेय शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी अकॅडमीकडून सातत्याने प्रयत्न केले जात असल्याचे यानिमित्ताने दिसून येते. दक्षच्या निवडीबद्दल फ्लाइंग बर्ड्स अकॅडमीचे प्राचार्य, शिक्षक, क्रीडा मार्गदर्शक, विद्यार्थी व पालकांनी त्याचे अभिनंदन केले असून, आगामी स्पर्धेसाठी त्याला शुभेच्छा दिल्या आहेत.

## अनिकेत बिटला यांची जागतिक पोलीस कराटे स्पर्धेसाठी निवड




**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

आयडियल मार्शल आर्ट्स, अहिल्यानगरचे प्रतिभावान कराटेपटू आणि सध्या पुणे पोलीस दलात कार्यरत असलेले अनिकेत बिटला यांनी राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत अहिल्यानगरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. हैदराबाद येथे झालेल्या राष्ट्रीय पोलीस कराटे स्पर्धेत अनिकेत बिटला यांनी सुवर्णपदक पटकावले. या दमदार कामगिरीच्या जोरावर त्यांची ऑस्ट्रेलिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय पोलीस कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत विविध राज्यांतील पोलीस खेळाडूंचा सहभाग असताना अनिकेत यांनी आपल्या कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन करत सुवर्णपदक मिळविले. त्यांच्या या कामगिरीमुळे आता आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी त्यांना मिळाली आहे. अनिकेत बिटला हे केवळ कराटेपुरते मर्यादित नसून ज्युदो, तायक्वांदो आणि वुशू या मार्शल आर्ट्स क्रीडा प्रकारांमध्येही राज्य व राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट खेळाडू म्हणून ओळखले जातात. अनिकेत बिटला यांच्या या यशाबद्दल आयडियल मार्शल आर्ट्स ग्रुपच्या वतीने वाडिया पार्क क्रीडा संकुलात त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशिक्षक, मार्गदर्शक, राष्ट्रीय पंच तसेच राष्ट्रीय खेळाडूंनी अनिकेत यांच्या यशाचे कौतुक करून आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी मुख्य प्रशिक्षक व मार्गदर्शक घनश्याम सानप, अनिकेतचे प्रशिक्षक धर्मनाथ घोरपडे, कराटे संघटनेचे सचिव व मार्गदर्शक अमोल काजळे, क्रीडा शिक्षक व प्रशिक्षक दीपक धनवटे, राष्ट्रीय पंच सचिन कोतकर, राष्ट्रीय खेळाडू सतीश शिंदे, राष्ट्रीय खेळाडू रोहित काळे आणि राष्ट्रीय खेळाडू ओम सानप आदी उपस्थित होते.

## अंजली धर्माधिकारी यांचे निधन

**● आष्टी । वीरभूमी–**



आष्टी येथील श्री दत्त मंदिर गल्ली येथील रहिवासी अंजली अरविंद धर्माधिकारी (वय ७९) यांचे मंगळवार दिनांक २२ रोजी रात्री हृदयविकाराने निधन झाले. अत्यंत धार्मिक, शांत व मनमिळाऊ स्वभावाच्या असलेल्या अंजली धर्माधिकारी या बाई या नावाने परिचित होत्या. बुधवारी खंडोबा मंदिर स्मशानभूमी, शेकापूर रोड, आष्टी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांसह नातेवाईक, मित्रपरिवार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. आष्टीतील सिद्धी कॉम्प्युटर्सचे संचालक अभय धर्माधिकारी, पत्रकार अनिरुद्ध धर्माधिकारी तसेच नगर येथील पत्रकार ॲड. अंबरीश धर्माधिकारी यांच्या त्या मातोश्री होत.

# पाणी असताना शेतीला पाणीबंदी कशासाठी?

### वीजपुरवठाही बंद, शेतकऱ्यांचा संताप । श्रीगोंद्यातील तलावांमधील पाणी उपशावरील बंदी उठविण्याची मागणी

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**



एकीकडे दुष्काळसदृश परिस्थितीने शेतकरी संकटात सापडला असताना दुसरीकडे तलावांमध्ये पाणी उपलब्ध असूनही शेतीसाठी पाणी उपशावर बंदी आणि वीजपुरवठाही खंडित करण्यात आल्याने श्रीगोंदा तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. पाणी उपलब्ध असताना शेतीला पाणी नाकारण्याचे कारण काय, असा सवाल उपस्थित करत शेतकरी नेते राजेंद्र म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी सोमवार दि. २८ रोजी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांची भेट घेऊन तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली.

श्रीगोंदा तालुक्यातील विसापूर, मोहरवाडी, घोटवी, पारगाव, घोडेगाव, देऊळगाव आणि औटीवाडी यांसह विविध तलावांमध्ये पाणी उपलब्ध असतानाही शेतीसाठी पाणी उपसा करण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्यातच संबंधित भागांतील शेतीचा वीजपुरवठाही बंद करण्यात आल्याने उभ्या पिकांना पाणी देण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. आधीच प्रतिकूल परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आता पिके वाचविण्याचे संकट उभे राहिले आहे.

यावेळी शेतकरी नेते राजेंद्र म्हस्के म्हणाले की शेतकरी दुष्काळाच्या संकटाशी झुंज देत असताना उपलब्ध पाण्याचा वापर करण्यास बंदी घालणे अन्यायकारक आहे. तलावांमध्ये पाणी असूनही ते शेतीसाठी वापरता येत नसेल आणि वीजपुरवठाही बंद असेल, तर शेतकऱ्यांनी पिके जगवायची कशी? प्रशासनाने पाणी उपशावरील बंदी आणि वीजपुरवठा खंडित करण्याचा निर्णय तातडीने मागे घ्यावा. जिल्हाधिकाऱ्यांच्या आश्वासनानुसार दोन दिवस वाट पाहू; अन्यथा शेतकऱ्यांच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरू.

माजी जिल्हा परिषद सदस्य हेमंत नलगे यांनीही प्रशासनाने तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल. त्यामुळे राजेंद्र म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.

हरिदास शिर्के यांनी उपलब्ध पाणी असूनही उपसा बंद केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी असल्याचे सांगितले. तर प्रशांत दरेकर यांनी धरणे आणि तलावांमध्ये पाणी असताना पाणी उपशावर बंदी का, असा सवाल उपस्थित करून उपलब्ध पाण्याचा नियोजनबद्ध वापर करण्यास परवानगी देण्याची मागणी केली.

शेतकऱ्यांच्या या मागण्यांवर जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी जलसंपदा आणि महावितरण विभागासोबत तातडीने बैठक घेऊन चर्चा करण्याचे आश्वासन दिले. या बैठकीत शेतकऱ्यांच्या मागण्यांचा विचार करून शेतकरी हिताचा निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे शेतकऱ्यांनी दोन दिवस प्रतीक्षा करण्याची भूमिका घेतली आहे.

पाणी उपशावरील बंदी उठविणे आणि शेतीचा वीजपुरवठा पूर्ववत करणे या मागण्यांवर दोन दिवसांत सकारात्मक निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

यावेळी राजेंद्र म्हस्के, हेमंत नलगे, हरिदास शिर्के, प्रशांत दरेकर, भाऊसाहेब नेटके, बाळासाहेब नलगे, विश्वास थोरात, अमित लगड, भूषण बडवे, सुभाष लगड, माऊली मोटे, बापूसाहेब चिखलठाणे, मच्छिंद्र नलगे, एकनाथ बारगुजे, महादेव म्हस्के, ज्ञानेश्वर खेतमाळीस, शिरसाट मेजर, प्रतिभा धस, प्रमोद म्हस्के यांच्यासह विसापूर, कोळगाव, पारगाव, घारगाव परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हर्षदा लांडगेचा 'प्रवरा क्रीडा रत्न' पुरस्काराने सन्मान

**● अकोले । वीरभूमी –**



आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेल्या व वडगाव लांडगा येथील आदर्श इंग्लिश स्कूलची माजी विद्यार्थिनी हर्षदा नानासाहेब लांडगे हिचा कराटे, बॉक्सिंग आणि टग ऑफ वॉर या क्रीडा प्रकारांत राज्यस्तरीय यश संपादन केल्याबद्दल 'प्रवरा क्रीडा रत्न' पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या वतीने अहिल्यानगर जिल्ह्यातील गेल्या तीन वर्षांत राष्ट्रीय व राज्य पातळीवर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा 'प्रवरा क्रीडा रत्न' पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात हर्षदा लांडगे हिला पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार सुजय विखे पाटील, सौ. सुश्मिता विखे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, पालक व खेळाडू उपस्थित होते.

हर्षदा हिने २०२३-२४ मध्ये कराटे, २०२४-२५ मध्ये बॉक्सिंग आणि २०२५-२६ मध्ये टग ऑफ वॉर या क्रीडा प्रकारांत राज्यस्तरावर यश संपादन केले आहे. तिला क्रीडा मार्गदर्शक सार्थक लांडगे व मल्हारी चोरमल यांचे मार्गदर्शन लाभले.

'प्रवरा क्रीडा रत्न' पुरस्कार मिळाल्याबद्दल आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेजच्या वतीने हर्षदाचा सत्कार करण्यात आला. आनंदगड शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, सचिव डॉ. अनिल रहाणे, संचालिका सौ. सुप्रिया वाकचौरे, सौ. गीता रहाणे, शिवराज वाकचौरे, अक्षय रहाणे, सौ. प्रतीक्षा रहाणे, प्राचार्या डॉ. पल्लवी फलके, प्राचार्य डॉ. किरण चौधरी, आनंदगड पॉलिटेक्निकचे समन्वयक विद्याचंद्र सातपुते, प्राचार्य विनोद गिरी, आदर्श इंग्लिश स्कूल, वडगाव लांडगाचे मुख्याध्यापक आर. आर. कानवडे, एम. डी. भोर तसेच आनंदगड शैक्षणिक संकुलातील प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी हर्षदाचे अभिनंदन केले. यावेळी तिचे वडील नानासाहेब लांडगे उपस्थित होते.

हर्षदाचे वडील नानासाहेब लांडगे यांनाही ५ ऑगस्ट रोजी सरपंच सेवा संघाच्या वतीने राज्यस्तरीय 'समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यामुळे लांडगे परिवारासाठी हा दुहेरी सन्मानाचा योग ठरला. समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल नानासाहेब लांडगे यांचाही यावेळी संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## अहिल्यानगर जिल्ह्यातील तांडा विकासाच्या प्रलंबित प्रश्नांचा आढावा

### महसुली दर्जा, शैक्षणिक सुविधा, पाणीपुरवठा व विकासकामांना गती देण्यावर भर

**● पाथर्डी । वीरभूमी–**



संत सेवालाल महाराज बंजारा-लमान तांडा समृद्धी योजनेअंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील तांड्यांमधील विकासकामांचा आढावा घेण्यासाठी नुकतीच बैठक झाली. तांड्यांमधील मूलभूत सुविधा, महसुली गावठाण, स्वतंत्र ग्रामपंचायती, शैक्षणिक सुविधा तसेच विकासकामांसाठी आवश्यक निधी याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस योजनेचे समन्वयक डॉ. जगदीश सकवान, प्रशासकीय अधिकारी रविंद्र राठोड, सचिन पानझाडे, निलेश जाधव आणि अक्षय राठोड उपस्थित होते. तसेच जिल्हा अशासकीय सदस्य विष्णुपंत पवार आणि तालुका अशासकीय सदस्य गुना पवार, रंगनाथ चव्हाण, अनिल पवार, लहू वडते, नरेश वडते व पोपट चव्हाण उपस्थित होते.

जिल्ह्यातील अनेक तांड्यांमध्ये शाळांच्या इमारतींचा अभाव असून, विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक शाळा इमारती व इतर पायाभूत सुविधा निर्माण करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर गावठाण विस्ताराचा प्रश्नही मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली.

तांड्यांना महसुली दर्जा व स्वतंत्र ग्रामपंचायत मिळवून देण्यासंदर्भातील प्रलंबित प्रस्तावांचा आढावाही घेण्यात आला. विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणे तसेच शासकीय जमिनी ग्रामपंचायतींना उपलब्ध करून देऊन त्यांचा सार्वजनिक सुविधांसाठी नियमानुसार वापर करण्याबाबत संबंधित विभागांकडे पाठपुरावा करण्याचे मुद्दे बैठकीत मांडण्यात आले.

तांड्यांमधील पाणीपुरवठा, अंतर्गत रस्ते, स्मशानभूमी, समाजमंदिर, आरोग्य सुविधा, शिक्षण, युवकांसाठी कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी याबाबतही विविध सूचना करण्यात आल्या. मंजूर निधीचा योग्य वापर, विकासकामांची गुणवत्ता आणि कामे वेळेत पूर्ण करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला.

तांड्यांच्या स्थानिक गरजा लक्षात घेऊन प्रलंबित प्रशासकीय प्रश्न मार्गी लावणे आणि विकासकामांना गती देण्यासाठी संबंधित विभागांमध्ये प्रभावी समन्वय वाढविण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला.

## रेसिडेन्शियल हायस्कूलच्या खेळाडूंचे विविध क्रीडा स्पर्धांत यश

### बुद्धिबळ, तायक्वांदो व मैदानी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी । जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड

**● शेवगाव । वीरभूमी –**

क्रीडा व युवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर आणि शेवगाव तालुका क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय बुद्धिबळ, तायक्वांदो व मैदानी क्रीडा स्पर्धांत येथील रेसिडेन्शियल हायस्कूलच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश संपादन केले. विविध क्रीडा प्रकारांतील कामगिरीच्या आधारे अनेक खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

यावर्षीच्या १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील मैदानी स्पर्धा शेवगाव इंग्लिश मीडियम स्कूल येथे पार पडल्या. या स्पर्धेत तालुक्यातील सुमारे ४०० मुला-मुलींनी सहभाग घेतला.

१४ वर्षे वयोगटात वैष्णवी साळवे हिने ८० मीटर हर्डल्समध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. १७ वर्षे वयोगटात भक्ती डोंगरे हिने ४०० मीटर धावणे व तिहेरी उडीमध्ये प्रथम क्रमांक मिळविला. तेजस्विनी मिसाळ हिने तिहेरी उडीत द्वितीय, सार्थक साखरे याने भालाफेकमध्ये तृतीय व तिहेरी उडीत द्वितीय, श्रीराज डमाळ याने तिहेरी उडीत प्रथम, संग्राम खैरे याने हातोडाफेकमध्ये प्रथम, ओंकार आंधळे याने हातोडाफेकमध्ये द्वितीय आणि कुमार गुठे याने १०० मीटर हर्डल्समध्ये द्वितीय क्रमांक मिळविला.

१९ वर्षे वयोगटात श्रद्धा भोसले हिने १५०० व ३००० मीटर धावण्यात द्वितीय क्रमांक, समीक्षा लांडे हिने ८०० मीटर धावणे व तिहेरी उडीत प्रथम क्रमांक, ऋतिका दौंड हिने लांब उडीत प्रथम क्रमांक, कृष्णा साळुंके याने १५०० व ४०० मीटर धावण्यात प्रथम क्रमांक, सुमित बोडखे याने तिहेरी उडीत प्रथम आणि कुणाल गुंठे याने तिहेरी उडीत द्वितीय क्रमांक पटकावला.

बुद्धिबळ स्पर्धेत पार्थ थोटे याने प्रथम क्रमांक मिळविला. तसेच तायक्वांदो स्पर्धेत राजलक्ष्मी लांडे, निधी पगारे, सोहम मोरे व शंभो रसाळ या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

यशस्वी खेळाडूंना क्रीडाशिक्षक रोहिदास जाधव व अझर पठाण यांचे मार्गदर्शन लाभले. या खेळाडूंचे प्राचार्य बालाजी गायकवाड, उपमुख्याध्यापक अविनाश रामफळे, पर्यवेक्षक महेश शिंदे, ज्युनिअर कॉलेजचे संजय अकोलकर आदींनी अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# 'आमदार विवेकभैय्या कोल्हे चषक' बुद्धिबळ स्पर्धेची उत्साहात सांगता

### ६ जिल्हे, २५ तालुक्यांतील ६०० हून अधिक खेळाडूंचा सहभाग; धानेधर आयुष, शिंदे वेदांत, ओम काळे व सार्थक शिंदे गटविजेते

**● कोपरगाव । वीरभूमी –**

चौसष्ट घरांच्या पटावर बुद्धिमत्ता, संयम, एकाग्रता, नियोजन आणि निर्णयक्षमतेची कसोटी पाहणाऱ्या आमदार विवेकभैय्या कोल्हे चषक राज्यस्तरीय खुल्या बुद्धिबळ स्पर्धा २०२६ ची उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. संजीवनी युवा प्रतिष्ठान व कोपरगाव चेस अँड स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने संत जनार्दन स्वामी आश्रम, पुणतांबा फाटा, कोपरगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला राज्यातील ६ जिल्हे व २५ तालुक्यांमधून ६०० हून अधिक खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तब्बल ४० हून अधिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतल्याने दोन दिवस कोपरगाव परिसर बुद्धिबळमय झाला.

आमदार कोल्हे म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्तेचे प्रदर्शन करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळावे आणि बुद्धिबळ खेळाची आवड अधिक व्यापक व्हावी, हा या स्पर्धेमागील मुख्य उद्देश आहे. बुद्धिबळामुळे विचारशक्ती, संयम, नियोजन आणि निर्णयक्षमता विकसित होते. कोपरगावच्या मातीतून भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तसेच ग्रँडमास्टर घडावा, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील.

धानेधर आयुष, शिंदे वेदांत, ओम काळे आणि सार्थक शिंदे विजेते स्पर्धेतील विविध गटांमध्ये खेळाडूंनी अत्यंत चुरशीच्या लढती दिल्या. अखेर १२ वर्षे गटात धानेधर आयुष, १४ वर्षे गटात शिंदे वेदांत, १९ वर्षे गटात ओम काळे आणि खुल्या गटात सार्थक शिंदे यांनी विजेतेपद पटकावले. लहान वयातील खेळाडूंची परिपक्वता, युवा खेळाडूंच्या आक्रमक रणनीती आणि खुल्या गटातील अनुभवी खेळाडूंच्या अचूक चालींमुळे स्पर्धेतील सामने शेवटच्या क्षणापर्यंत रंगले.

स्पर्धेतील गुणवंत खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी तब्बल ६२ रोख पारितोषिके आणि १३२ चषक ठेवण्यात आले होते. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या खेळाडूंना कोपरगावमध्ये आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळाली.

स्पर्धेचे उद्घाटन संजीवनी महिला बचत गटाच्या अध्यक्षा रेणुकाताई कोल्हे यांच्या हस्ते झाले होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार स्पर्धांचे व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन मिळावे, यासाठी ही स्पर्धा अत्यंत महत्त्वाची आहे, असे रेणुकाताई कोल्हे यांनी सांगितले.

स्पर्धेच्या निमित्ताने अर्जुन पुरस्कारप्राप्त ग्रँडमास्टर विदित संतोष गुजराथी यांच्या यशस्वी आणि संघर्षमय प्रवासाचा विशेष गौरव करण्यात आला. विदित गुजराथी यांच्या यशामागील कुटुंबीयांच्या योगदानाचा सन्मान म्हणून त्यांचे वडील डॉ. संतोष गुजराथी यांना मानपत्र प्रदान करून आमदार विवेकभैय्या कोल्हे व नगराध्यक्ष पराग संधान यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला..

संजीवनी युवा प्रतिष्ठान व कोपरगाव चेस अँड स्पोर्ट्स क्लब यांच्या वतीने सन २०२० पासून 'आमदार विवेकभैय्या कोल्हे चषक' बुद्धिबळ स्पर्धेचे नियमित आयोजन केले जाते. यंदा या स्पर्धेचे पाचवे वर्ष असून, मागील वर्षांच्या तुलनेत यंदा मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविण्यात आला.




आज या पटावर खेळणाऱ्या लहान मुलांपैकी एखादा खेळाडू उद्या देशाचे प्रतिनिधित्व करू शकतो. योग्य प्रशिक्षण, स्पर्धेचा अनुभव, पालकांचे प्रोत्साहन आणि सातत्यपूर्ण सराव मिळाला, तर कोपरगावमधूनही ग्रँडमास्टर घडू शकतो, असा विश्वास आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी नगराध्यक्ष पराग संधान, प्राचार्य राजेंद्र पानसरे, डॉ. संतोष गुजराती, डॉ. निकिता गुजराती, नगरसेवक संतोष शिंदे, संजय उदावंत, डॉ. दीपक नाईकवाडे, संजीव बोरावके, राजीव बोरावके, तिलक अरोरा, किशोर टिळेकर, राजेंद्र गुरली, विजय शेळके, आबा गिरमे, राधाकिसन वलटे, महावीर शिंगी, नितीन सोळके, प्रमोद वाणी, संकेत गाडे, महेश थोरात, राजेंद्र कोळपकर, लक्ष्मण सताळे, तालुका क्रीडा अधिकारी शिवप्रसाद घोडके, मुख्य पंच सागर गांधी, प्रशांत धनगेकर आदी मान्यवर उपस्थित होते. खेळाडूंचे पालकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुमची परीक्षा MPSC-UPSC ची, आमची निवडणुकीची !

## डॉ. सुजय विखे पाटील । भगवतीमाळ-खंदरमळा येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

**● संगमनेर । वीरभूमी-**

**तुमच्यासाठी एमपीएससी-यूपीएससीची परीक्षा आहे, तर आमच्यासाठी निवडणुकीची परीक्षा आहे. तुम्ही एकदा अपयश स्वीकारून पुन्हा यश मिळवले, तसेच मीही लोकसभेच्या निवडणुकीत पराभव स्वीकारल्यानंतर पुन्हा जनतेच्या आशीर्वादाने तुमच्यासमोर उभा आहे. प्रत्येकाच्या जीवनात संघर्ष असतो. मात्र, सर्वसामान्य आणि गोरगरीब कुटुंबातील मुलांनी शिक्षणाच्या बळावर शासकीय सेवेत स्थान मिळवणे, यापेक्षा आनंदाचा दिवस माझ्या जीवनात दुसरा कुठलाही नाही, असे प्रतिपादन भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.**

संगमनेर तालुक्यातील भगवतीमाळ-खंदरमळा येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा परीक्षांमध्ये तसेच पोलीस भरतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा जाहीर गौरव व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी डॉ. सुजय विखे पाटील बोलत होते. कार्यक्रमास आमदार अमोल भाऊ खताळ तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्र टाइम्सचे पुणे उपसंपादक प्रशांत काशिनाथ आहेर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे नियोजन जनार्दन आहेर यांनी केले. तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले, सामान्य कुटुंबातील एखादा मुलगा किंवा मुलगी शिक्षण घेऊन चांगल्या पदावर पोहोचते, तेव्हा त्यांच्या यशाचा गौरव करण्यासाठी उपस्थित राहणे मला नेहमीच आनंदाचे वाटते. कारण स्वप्न पाहण्याचे धाडस आणि ते पूर्ण करण्यासाठी केलेला संघर्ष हा सोपा प्रवास नसतो.

आज संघर्ष करून अधिकारी झालेली हीच मुले उद्या मोठ्या पदांवर पोहोचतील. आपल्या गावातील एखादा व्यक्ती मोठ्या पदावर गेल्यानंतर त्याचा फायदा केवळ त्याच्या कुटुंबाला होत नाही, तर संपूर्ण गावाला आणि समाजाला होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

गावाच्या विकासाच्या मागण्यांसोबतच शाळांच्या पायाभूत सुविधांकडेही गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले. शाळांच्या खोल्या, संगणक, डिजिटल बोर्ड, मुलींसाठी स्वच्छतागृहे आणि शुद्ध पाण्याची सुविधा या मूलभूत गरजा असून त्याकडेही लक्ष दिले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले. जोपर्यंत आपण आपल्या मुलांचा पाया मजबूत करत नाही, तोपर्यंत त्यांना उज्ज्वल भविष्य देता येणार नाही. त्यामुळे कुठेतरी सुरुवात झाली पाहिजे आणि ती सुरुवात करण्याचा निर्णय आपण घेतला आहे, असे ते म्हणाले.संगमनेर तालुक्यातील शाळांच्या पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी पुढील काळात प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी सांगितले.

गरीब आणि सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करता यावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा नियोजनाच्या माध्यमातून दरवर्षी निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

योग्य मार्गदर्शन आणि संधी मिळाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थीही मोठ्या पदांवर पोहोचू शकतात. त्यामुळे स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा निर्माण करण्यावर भर दिला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

आपली मुलं शिकवा, मुलींना शिकवा आणि त्यांना समान संधी द्या. तुमची मुलं जेव्हा मोठी होतील, तेव्हा तुम्हाला गावातील कोणत्याही पदापेक्षा अधिक सन्मान मिळेल. सरपंच एकच होणार, आमदार एकच होणार, खासदारही एकच होणार; मात्र आपल्या मुलांच्या शिक्षणातून निर्माण होणारे यश अनेक पिढ्यांना पुढे नेते, असे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

राजकीय स्पर्धेपेक्षा कुटुंब, मुलांचे शिक्षण आणि आई-वडिलांचे कल्याण यांना प्राधान्य देण्याचे आवाहन करताना त्यांनी राजकारणासाठी कर्जबाजारी होऊ नये, असेही स्पष्ट केले. आपल्या मुलाबाळांच्या विकासासाठी आणि आई-वडिलांच्या कल्याणासाठी प्रथम काम करा, असे ते म्हणाले.

यावेळी आमदार अमोल भाऊ खताळ यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धा परीक्षांमधील यश एका दिवसात मिळत नसून त्यासाठी सातत्यपूर्ण मेहनत, योग्य नियोजन आणि अपयशातून शिकण्याची तयारी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी मिळालेल्या यशावर समाधान न मानता पुढील ध्येय निश्चित करून त्यासाठी प्रयत्नशील राहावे. आपल्या यशातून कुटुंबासोबतच गावाचे आणि परिसराचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन आमदार खताळ यांनी केले. यावेळी त्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

गुणवंत विद्यार्थ्यांच्या भविष्यातील भूमिकेवर भाष्य करताना डॉ. विखे पाटील यांनी सांगितले की, आज संघर्ष करून



अधिकारी झालेली हीच मुले भविष्यात मोठ्या पदांवर पोहोचतील. त्यावेळी आपल्या गावाच्या आणि परिसराच्या विकासासाठी ते आपल्या परीने योगदान देतील.आपला माणूस कुठेतरी मोठ्या पदावर पोहोचल्यानंतर त्याचा फायदा संपूर्ण गावाला होतो. आपण कितीही मोठे लोकप्रतिनिधी झालो, तरी अनेक विकासकामांना प्रशासकीय स्तरावरील निर्णयांची आवश्यकता असते. त्यामुळे भविष्यात आपल्या तालुक्याच्या विकासाची योजना एखाद्या अधिकाऱ्यापुढे आली आणि त्याने 'हा माझा तालुका आहे' या भावनेतून ती पुढे नेली, तर त्याचा फायदा संपूर्ण परिसराला होईल, असे त्यांनी नमूद केले.

परिसरातील सबस्टेशनच्या प्रश्नावरही डॉ. विखे पाटील यांनी स्पष्ट भूमिका मांडली. मला खोटे आश्वासन देता येत नाही. 'करू', 'पाहू', 'उद्या या', 'परवा या' हा माझा स्वभाव नाही. जे शक्य आहे त्याला 'हो' आणि जे शक्य नाही त्याला स्पष्ट 'नाही' सांगणे, हीच माझी कार्यपद्धती आहे, असे त्यांनी सांगितले.एकदा 'हो' म्हटल्यानंतर ते काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणे ही माझी भूमिका आहे. सबस्टेशनचा प्रश्न एका वर्षात पूर्ण करण्याचा शब्द मी आमदार अमोल खताळ यांच्या वतीने आणि माझ्या वतीने तुम्हाला देतो, असे डॉ. विखे पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले.

कार्यक्रमात एमपीएससी, विविध स्पर्धा परीक्षा तसेच पोलीस भरतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या यशामुळे भगवतीमाळ-खंदरमळा आणि पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले होते कार्यक्रमास भगवतीमाळ-खंदरमळा तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ, महिला, विद्यार्थी, पालक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बेल्हे विद्यालयात जादूगार प्रकाश शिरोळे यांनी जादूच्या प्रयोगातून दिला अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश



**● जुन्नर । वीरभूमी-**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री बेल्हेश्वर व कै. हरिभाऊशेठ गुंजाळ उच्च माध्यमिक विद्यालय, बेल्हे येथे १३९व्या कर्मवीर जयंती सप्ताह सोहळ्यानिमित्त अंधश्रद्धा निर्मूलन व समाजप्रबोधनपर 'अरुण वाळुंज टॉक्स' व्यासपीठाच्या अंतर्गत 'जादूचे प्रयोग' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध जादूगार प्रकाश शिरोळे यांनी विविध जादूचे प्रयोग सादर करत भोंदूबाबा, चमत्कारांमागील विज्ञान आणि अंधश्रद्धेचे विविध प्रकार यावर प्रबोधन केले. जादूच्या प्रयोगांमागील शास्त्रीय कारणे स्पष्ट करत विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारावा, असा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या विविध प्रयोगांनी विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले.

यावेळी चित्रपट गीतकार अरुण वाळुंज यांनी 'महाराष्ट्राच्या मातीला, साऱ्या जातीपातीला एकच अधिपती' हे छत्रपती शिवाजी महाराजांवरील गौरवगीत सादर केले. विद्यार्थ्यांनी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणा देत गीताला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमास प्राचार्य राजेंद्र पडवळ, पर्यवेक्षक दत्तात्रय खोरे, शिक्षकवृंद तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोपरगावातील पिकांचे तातडीने पंचनामे करून शासनाला अहवाल सादर करा

### आ. आशुतोष काळेंच्या महसुल व कृषी विभागाला सूचना

**● कोपरगाव । वीरभूमी-**

मतदारसंघात पावसाचा प्रदीर्घ खंड पडल्यामुळे कोपरगाव तालुक्यात दुष्काळ जाहीर करावा यासाठी केलेल्या अथक पाठपुराव्यातून गंभीर दुष्काळाची परिस्थिती लक्षात घेवून राज्य शासनाने कोपरगाव मतदारसंघ दुष्काळग्रस्त जाहीर करत ट्रिगर-१ लागू केला आहे. त्यामुळे शासनाच्या मदतीपासून मतदारसंघातील एकही पात्र शेतकरी वंचित राहू नये यासाठी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन तातडीने नुकसानीचे पंचनामे करा व शासनाला त्वरित अहवाल सादर करा अशा सूचना आ.आशुतोष काळे यांनी तहसीलदार महेश सावंत, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे यांना दिल्या आहेत.



कोपरगाव मतदारसंघात ट्रिगर-१ लागू झाल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या अनेक सवलती लागू करण्यात येणार आहेत. यामध्ये जमीन महसूलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू वीजबिलात सूट तसेच शेतकऱ्यांची वीज जोडणी खंडित न करणे यांसारख्या निर्णयांचा समावेश आहे. यासोबतच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरू करणे, आवश्यक तिथे टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरवणे, शेतकरी व शेतमजुरांसाठी अन्नधान्याची टंचाई भासू न देणे आणि जनावरांसाठी चाऱ्याची योग्य व्यवस्था करणे अशा विविध उपाययोजना तातडीने राबवल्या जाणार आहेत.

सध्याची परिस्थिती अत्यंत गंभीर असून दुष्काळाने शेतीचे अर्थकारण पूर्णपणे कोलमडले असून अगोदरच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणीत अधिकची भर पडली आहे. अशा परिस्थितीतही महायुती शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून जास्तीत जास्त आर्थिक मदत व नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी नेहमी प्रमाणे राज्य सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे आ.आशुतोष काळे यांनी सांगितले आहे. मतदारसंघातील एकही नुकसानग्रस्त शेतकरी पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही याची काळजी घ्या. पंचनामे करतांना कोणताही दुजाभाव किंवा दिरंगाई न करता पंचनामे तातडीने पूर्ण करा अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी तहसीलदार महेश सावंत आणि तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे यांना दिल्या आहेत.

## मळगंगा ट्रस्टची अभ्यासिका शैक्षणिक संस्कृतीला पाठबळ देणारी

### शिवाजी कराड । अभ्यासिकेला भेट देत सुविधांचे केले कौतुक



**● निघोज । वीरभूमी-**

ग्रामीण विद्यार्थ्यांना शैक्षणिक चालना देण्यासाठी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या वतीने सुरू करण्यात आलेली अभ्यासिका शैक्षणिक संस्कृतीला पाठबळ देणारी आहे, असे प्रतिपादन अहिल्यानगर शिक्षक बँकेचे उपाध्यक्ष तथा नेवासा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड यांनी केले.

कराड यांनी शरदचंद्रजी पवार साहेब इमारतीमधील मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या अभ्यासिकेला भेट दिली. यावेळी ट्रस्टचे विश्वस्त संतोषशेठ रसाळ यांच्या हस्ते कराड यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी शिक्षक सहकारी बँकेचे संचालक कारभारी बाबर, मुख्याध्यापक अशोक कळमकर, मुख्याध्यापक बाजीराव भाईक, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, ट्रस्टचे व्यवस्थापक महेश ढवळे आदी उपस्थित होते.

कराड म्हणाले, मी अनेक अभ्यासिका पाहिल्या आहेत. मात्र, येथे इंटरनेट, संगणक, विद्यार्थ्यांसाठी बसण्याची व्यवस्था, प्रशिक्षक तसेच परिसरातील शैक्षणिक वातावरण या सर्व बाबी विशेष भावणाऱ्या आहेत. ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब कवाद यांचे शैक्षणिक स्वप्न या माध्यमातून पूर्ण झाले आहे.

ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद, उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ तसेच सर्व पदाधिकारी व विश्वस्त मंडळाने लोकसहभागातून ही अभ्यासिका उभी केली आहे. गेल्या अडीच वर्षांत येथे शेकडो विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास केला असून, त्यातील अनेकांना विविध पदांवर काम करण्याची संधी मिळाली आहे. प्रत्येक गावात अशा अभ्यासिकांची गरज असल्याचेही कराड यांनी सांगितले.

सूत्रसंचालन ट्रस्टचे व्यवस्थापक महेश ढवळे यांनी केले तर उपव्यवस्थापक रोहन उनवणे यांनी आभार मानले.

# गणेशोत्सवातून 'जागर शिक्षणाचा'

## बालविवाह, बालमजुरी व शाळाबाह्य मुलांच्या प्रश्नांवर जनजागृती करणारा उपक्रम स्तुत्य : खा. निलेश लंके

**● शेवगाव । वीरभूमी-**

गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक व शैक्षणिक प्रश्नांवर जनजागृती करण्याचा उपक्रम शिक्षणाला समाजाशी आणि गावाला शाळेशी जोडणारा आहे. बालमजुरी, बालविवाह, स्थलांतरित विद्यार्थी व शाळाबाह्य मुलांच्या प्रश्नांबाबत या माध्यमातून निश्चितच जागृती निर्माण होईल, असा विश्वास अहिल्यानगरचे खासदार निलेश लंके यांनी व्यक्त केला.

शेवगाव येथील पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त 'उत्सव श्रीगणेशाचा- जागर शिक्षणाचा' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयोजित कार्यक्रमात खासदार लंके बोलत होते.

कार्यक्रमास प्रा. सीताराम काकडे, संस्थेचे अध्यक्ष प्रा. रमेश भारदे, सचिव हरीश भारदे, माजी प्राचार्य शिवाजीराव देवढे, गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ, अशोक भागवत, सुनील रासने, शिवसेना नेते अरुण मुंढे, नगरसेवक आशुतोष डहाळे, रोहित काथवटे, नितीन दहिवाळकर यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी व नागरिक



उपस्थित होते.

गणेशोत्सवाच्या पारंपरिक उत्साहाला सामाजिक जाणीवेची जोड देत शाळेने बालविवाह, बालमजुरी, शाळाबाह्य विद्यार्थी आणि स्थलांतरित विद्यार्थ्यांच्या समस्या या विषयांवर लक्ष केंद्रित केले. या समस्यांबाबत शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजना, संबंधित कायदे तसेच चाइल्ड लाइन, स्नेहालय, विधायक भारती यांसारख्या सेवाभावी संस्थांचे योगदान यांची माहिती नागरिकांना देण्यात आली.

प्रदर्शनात दृक्श्राव्य माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात आला. पोस्टर्स, माहितीफलक, कविता, गीते तसेच विविध संदेशांच्या माध्यमातून शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलांचे प्रश्न मांडण्यात आले. शिक्षणतज्ज्ञ हेरंब कुलकर्णी यांच्या 'शाळाबाह्य लेकरं' या कवितेच्या एक हजार प्रती शाळेच्या वतीने नागरिकांना वितरित करण्यात आल्या.

गणेशोत्सवाच्या काळात या शैक्षणिक प्रदर्शनाला नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देत उपक्रमाची माहिती जाणून घेतली. धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून समाजातील गंभीर प्रश्नांकडे नागरिकांचे लक्ष वेधण्याचा शाळेचा प्रयत्न चर्चेचा विषय ठरला. प्राचार्य उमेश घेवरीकर यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकारला असून, शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

### सामाजिक प्रश्नांवर विचारमंथन व्हावे

■ शेवगाव शहराला गणेशोत्सवाची मोठी परंपरा आहे. सामाजिक आणि शैक्षणिक जनजागृतीसाठी या उत्सवाचा उपयोग करण्याचा प्रयत्न आम्ही केला. शिक्षण क्षेत्रासमोरील विविध समस्यांवर या उपक्रमाच्या माध्यमातून समाजात विचारमंथन व्हावे, ही अपेक्षा आहे.

– **हरीश भारदे,** सचिव, भारदे साक्षरता प्रसारक मंडळ, शेवगाव

## जागतिक पर्यटन दिनी चांदबिबी महाल परिसरात वृक्षारोपण अन् स्वच्छता अभियान

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने शहराच्या ऐतिहासिक चांदबिबी महाल परिसरात वृक्षारोपण व स्वच्छता अभियान राबविण्यात आले. ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्याबरोबरच परिसराचे पर्यावरण संवर्धन करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

या उपक्रमात चांदबिबी महाल परिसरात वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच परिसरातील स्वच्छता करून पर्यटकांना स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक परिसर उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. ऐतिहासिक स्थळे ही केवळ पर्यटनाची केंद्रे नसून आपल्या इतिहासाची आणि संस्कृतीची ओळख असल्याने त्यांचे संवर्धन करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, विकास भिंगारदिवे, जहीर सय्यद, सचिन चोपडा, अशोक पराते, सुंदरराव पाटील, सर्वेश सपकाळ, ताराचंद ठोकळ, विलास आहेर, दिलीप ठोकळ, अशोक लोंढे, दिलीप गुगळे, अभिजीत सपकाळ, दीपकराव धाडगे, मनोहर दरवडे, योगेश चौधरी, जालिंदर अळकुटे, नवनाथ वेताळ, अविनाश जाधव, शेषराव पालवे, जोगिंदरसिंग, सखाराम अळकुटे, अविनाश पोतदार, सुभाष पेंढुरकर, सरदारसिंग परदेशी, इंजि. अनिल सोळसे, दीपकराव घोडके, उमाशंकर सिंग, दीपकराव मेहतानी, दीपक अमृत, विशाल भामरे आदींसह ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

हरदिन मॉर्निंग ग्रुपचे सदस्य संजय भिंगारदिवे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागात भांडारपाल म्हणून तब्बल ३० वर्षे सेवा बजावली. त्यांच्या प्रदीर्घ, प्रामाणिक व सेवाभावी कार्याची दखल घेत जागतिक पर्यटन दिनाच्या कार्यक्रमात हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने त्यांचा सेवापूर्तीबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन त्यांना गौरविण्यात आले.